# शिष्यवृत्ती / शुल्क सवलती

| अ.क्र. | शिष्यवृत्ती / शुल्क सवलती चा प्रकार | अर्ज करण्याची अंतिम तिथी |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती वार्षिक उत्पन्न मर्यादा<br>अनुसूचित जाती, जमाती, १,००,००० /- (एस.सी./एस.टी.)<br>१,००,०००/- (ओबीसी/ व्ही.टी./ पी.टी./ एस.बी.सी.) | ३१ जुलै. २०१९ |
| २. | अपंग शिष्यवृत्ती | ३१ जुलै २०१९ |
| ३. | आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी | ३१ जुलै २०१९ |
| ४. | कर्जाऊ शिष्यवृत्ती | ३१ जुलै २०१९ |
| ५. | मेरीट शिष्यवृत्ती | ३१ जुलै २०१९ |
| ६. | प्राथमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना मेरीट शिष्यवृत्ती | ३१ जुलै २०१९ |
| ७. | आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलत | ३१ जुलै. २०१९ |
| ८. | ११ व १२ वी च्या विद्यार्थीनींना शुल्क सवलत (Girls Concession) | ३१ जुलै. २०१९ |
| ९. | राज्य सरकारी कर्मचारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थामधील<br>कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शुल्क सवलत | ३१ जुलै. २०१९ |
| १०. | प्राथमिक शाळा शिक्षकाच्या अपत्यांना शुल्क सवलत | ३१ जुलै. २०१९ |
| ११. | स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलांना शुल्क सवलत | ३१ जुलै. २०१९ |
| १२. | माजी लष्करी जवानांच्या मुलांना शुल्क सवलत | ३१ जुलै. २०१९ |
| १३. | ज्या अनुसूचित जाती जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमातीतील<br>विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न शिष्यवृत्ती मर्यादेच्या बाहेर आहे, अशा विद्यार्थ्यांना शुल्क सवलती<br>साठीचा विहीत अर्ज सादर करता येईल. इ.बी.सी. सवलतीचा अर्ज त्यांनी सादर करू नये. | ३१ जुलै. २०१९ |
| १४. | अनुसूचित जाती जमाती, भटक्या जाती - जमाती चे विद्यार्थी एकदा<br>परिक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास आणि त्यांनी पुन्हा त्याच वर्गात प्रवेश घेतला असेल तर केवळ एकदा त्यांना<br>शुल्क सवलत मिळू शकते. त्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. | ३१ जुलै. २०१९ |

१. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जाती जमाती, विशेष मागास प्रवर्गातील एस.एस.सी. नंतर च्या अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती : वरिल प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या एस.एस.सी.नंतर च्या अभ्यासक्रमासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती संचालक, समाज कल्याण महाराष्ट शासन आणि भारत सरकार यांच्या मार्फत दिल्या जाते.

## शिष्यवृत्तीसाठी अर्ज

वार्षिक १ लक्ष रुपयापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांचे अपत्य शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात. अर्ज पूर्णत: भरलेला, खाडाखोड नसलेला असावा. खोटी माहिती दिल्यास त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविले जाईल. ज्यांच्या शिक्षणात खंड पडला असेल त्याने त्या काळात तो काय करित होता. या संबंधीचे कोर्टाचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे. खोटे प्रतिज्ञापत्र सादर करणे दंडनीय गुन्हा ठरतो. जिल्ह्याबाहेरील विद्यार्थ्याने जिल्हाबदल प्रमाणपत्र त्या जिल्ह्याचे जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी यांचेकडून प्राप्त करून तो सादर करणे आवश्यक आहे. बी.ए. व बी.कॉम भाग १ या वर्गात प्रथमच प्रवेश घेतलेल्या वरिल जाती जमातीच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नवीन (फ्रेश) आवेदन पत्र सादर करावे. आवेदन पत्र सादर करताना बँक ऑफ महाराष्ट , मोर्शी शाखेत विद्यार्थ्याने स्वत:चे खाते उघडून पासबुकच्या प्रथम पृष्ठाची छायांकित प्रत (झेरॉक्स) जोडावी.

खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही.

१. एक व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करुन दुसरा व्यवसायिक अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळणार नाही.

२. वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या व एटीकेटी मध्ये पात्र नसणाऱ्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. मात्र एटीकेटी मध्ये वरच्या वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळेल.

३. समान अभ्यासक्रमाला पुन्हा शिष्यवृत्ती मिळणार नाही. (उदा.बी.ए. झालेल्या विद्यार्थ्यास बी.कॉम मध्ये शिष्यवृत्ती मिळणार नाही.)

४. ज्या विद्यार्थ्याच्या पालकांचे सर्व साधनापासून होणारे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/-पेक्षा जास्त असेल तर त्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही.

५. जे विद्यार्थी पुर्णकालीन नोकरी करीत असतील त्यांचे व त्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ६० हजाराचे वर असेल अशा विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.

६. एका पालकाच्या फक्त दोनच अपत्यांना शिष्यवृत्ती मिळू शकेल.

२. ओपन मेरीट फ्री स्टुडंटशिप - जे विद्यार्थी मागासवर्गीय जाती जमातीचे नाही व ज्यांचे वार्षिक उत्पन्न १५ हजार रु. च्या आत आहे. अशा विद्यार्थ्यांना ही फ्रिशिप मिळते पण त्या विद्यार्थ्यास चांगले गुण असले पाहिजे.

३. अपंग शिष्यवृत्ती : किमान ४० टक्के गुण प्राप्त करुन उत्तीर्ण झालेल्या अपंग विद्यार्थ्यास ही शिष्यवृत्ती मिळते. त्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज शिवाय अपंग असल्याचा जिल्हा शल्यचिकित्सकाचा दाखला व स्वत:चे अपंगत्व दर्शविणारे पूर्ण छायाचित्रासह सादर करावे.

४. मेरीट स्कॉलरशिप : शेकडा ७५ % गुणाच्या वर गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मेरीट बेसीसवर ही शिष्यवृत्ती मिळू शकते. अर्ज विहीत नमुन्यात सादर करावा.

.५ कर्जाऊ शिष्यवृत्ती : ज्यांच्या पालकांचे मागील आर्थिक वर्षातील उत्पन्न ६० हजार आहे. अशा विद्यार्थ्यांना कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळू शकते. मात्र विद्यार्थ्यास परीक्षेत किमान ६० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळाले पाहिजे.

६. माध्यमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना मेरीट शिष्यवृत्ती : ज्या माध्यमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना ७५ टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळतात ते या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करू शकतात.

७. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती : जे विद्यार्थी एस.एस.सी. परिक्षेत ४५ टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेत अशा फक्त वर्ग ११ च्या विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा.

८. प्राथमिक शाळा शिक्षकांच्या १९६८ नंतर जन्मलेल्या केवळ २ अपत्यांना शुल्क व परीक्षा शुल्क सवलत मिळू शकते. मात्र सेवानिवृत्त शिक्षकांच्या मुलांना ही सवलत मिळणार नाही. अशा विद्यार्थ्यांनी ठराविक नमुन्यात उत्पन्नाच्या दाखल्यासह रेशन कार्डाच्या पुढील आणि शेवटच्या पानाच्या प्रमाणित झेरॉक्ससह दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

९. स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलांना शिष्यवृत्ती : सन्मानपत्रासह विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक.

१०. राज्य सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १९६८ नंतर जन्मलेल्या केवळ २ अपत्यांना ज्या कर्मचाऱ्यांचे मुळ वार्षिक वेतन १५,००० च्या आत असेल त्यांना शुल्क सवलत मिळू शकते. अश्या विद्यार्थ्यांनी ठराविक नमुन्यात उत्पन्नाच्या दाखल्यासह शिवाय रेशन कार्डाच्या पुढील आणि शेवटच्या पानाच्या प्रमाणीत झेरॉक्स दोन प्रती सादर करणे आवश्यक आहे.

११. विद्यार्थी मदत निधी : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यार्थी मदत निधी मधून वार्षिक विशिष्ट रक्कम विद्यापीठातर्फे प्रदान केल्या जाते.

त्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज महाविद्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अंतिम निवड विद्यापीठातर्फे करण्यात येते.

१२. इ.बी.सी. सवलत -

१) आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या १ लाख रु. वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आणि १९६८ नंतर जन्मलेल्या केवळ ३ अपत्य असणाऱ्या पालकांच्या मुला - मुलींना इ.बी.सी. सवलत मिळते. अशा विद्यार्थ्यांनी ठराविक नमुन्यात उत्पन्नाच्या दाखल्यासह शिवाय रेशन कार्डाच्या पुढील आणि शेवटच्या पानाच्या प्रमाणित झेरॉक्स दोन प्रतीसह इ.बी.सी. अर्ज दोन प्रतीत साद करणे आवश्यक आहे.

इ.बी.सी सवलत धारकांना शिक्षण शुल्क, प्रवेश शुल्क , ग्रंथालय शुल्क व अभ्यासेत्तर कार्यक्रम शुल्क माफ असते. इतर शुल्काचा भरणा त्यांना करावा लागेल.

२) वर्ग ११ व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सुरु झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत व वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत इबीसी चे आवेदनपत्र सादर करावे.

३) आई वडील हयात नसल्यास पालकांच्या स्वाक्षरीने इबीसी अर्ज सादर करावा. आई वडीलपैकी कोणीही हयात असतील तर अन्य पालकाच्या स्वाक्षरीचा अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही. आई वडील दोन्ही हयात नसतील किंवा वडील हयात नसेल तर त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रमाणित दोन प्रतीत सत्य प्रत इबीसी आवेदनपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

४) ज्या गावाची लोकसंख्या १० हजाराच्या आत आहे अशा गावातील विद्यार्थ्यांनी उत्पन्नाच्या दाखल्यावर सरपंचाच्या सही शिक्क्याचे उत्पन्नाचा दाखला तर शहरी भागातील विद्यार्थ्यांनी तहसीलदार यांच्या सही शिक्क्याच्या उत्पन्नाचा दाखला सादर करावा. उपसरपंचाची स्वाक्षरी उत्पन्नाच्या प्रमाणपत्रावर चालणार नाही.

५) सवलतीच्या अर्जातील माहिती चुकीची व अपुरी किंवा खोटी आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची व त्याच्या पालकाची राहील.

६) शिक्षणात खंड पडला असेल तर त्याने त्या कालावधित काय केले याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) १९६८ नंतर जन्मलेल्या केवळ ३ अपत्य असणाऱ्या पालकांच्या मुलींना मोफत शिक्षण सवलत केवळ वर्ग ११ आणि वर्ग १२ च्या विद्यार्थीनींना मिळते. त्यासाठी रेशन कार्डाच्या पुढील आणि शेवटील पानाच्या दोन दोन प्रमाणित झेरॉक्स प्रतीसह दोन प्रतीत विहीत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. त्या शिवाय वर्ग ११ आणि १२ च्या विद्यार्थीनींना शुल्क सवलत मिळणार नाही.

१३) ज्या अनुसूचीत जाती जमाती, भटक्या जाती जमातीच्या विद्यार्थ्याच्या पालकांचे उत्पन्न ६० हजारापेक्षा जास्त आहे किंवा जे वरील प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थी त्याच वर्गात अनुत्तीर्ण झाले असतील. त्यांना केवळ एकदा त्याच वर्गात पुन्हा प्रवेश घेतल्यास प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास आणि विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडून शिक्षण शुल्क, प्रवेश शुल्क, ग्रंथालय शुल्क, प्रयोगशाळा शुल्क , जीमखाना शुल्क, परीक्षा शुल्क माफी मिळते. यासाठी विहीत नमुन्यातील कास्ट ॲन्ड इन्कम डिक्लरेशन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

कोणत्याही सवलती किंवा शिष्यवृत्ती च्या अर्जावर संबंधीत अधिकाऱ्यांकडून तृटी काढण्यात आली किंवा आक्षेप घेण्यात आले तर विद्यार्थ्यांना विहीत मुदतीच्या आत त्या तृटी पूर्ण कराव्या लागतील. असे न केल्यास शिष्यवृत्ती व सवलतीचा अर्ज रद्द ठरेल आणि विद्यार्थ्यास पूर्ण शुल्क भरावे लागेल.

कोणत्याही विद्यार्थ्यास केवळ एकच शुल्क माफी किंवा शिष्यवृत्तीचा अर्ज करता येईल. एकापेक्षा अधिक अर्ज सादर केल्यास ते रद्द करण्यात येईल. शिष्यवृत्ती / शुल्क माफी च्या अर्जाची पोच कार्यालयातील संबंधित लिपिकांकडून प्राप्त करुन घ्यावी पोच पावती आणि ओळखपत्राशिवाय त्याच्या या संबंधातील तक्रारीवर विचार केल्या जाणार नाही.

## महाविद्यालयीन पुरस्कार योजना

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ स्नातक परीक्षा पहिल्या श्रेणीत सर्वाधिक गुण प्राप्त करून उत्तीर्ण होणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर बक्षिस महाविद्यालयातर्फे देण्यात येईल. तसेच निरनिराळ्या विषयात महाविद्यालयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर बक्षिसाची योजना महाविद्यालयाच्या शिक्षकवृंदातर्फे राबविण्यात येत आहेत.

## महाविद्यालयाचे ग्रंथालय

महाविद्यालयातील ग्रंथालय सर्व विषयातील ग्रंथांनी, संदर्भ ग्रंथांनी समृध्द असून दरवर्षी त्यात भर पडत असते. ग्रंथालयाचा पुरेपूर उपयोग विद्यार्थ्यांनी घेणे त्याचबरोबर ग्रंथालयाची नासधूस होणार नाही याची दक्षता घेणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. महाविद्यालयातून पुस्तके प्राप्त करण्यासाठी या सोबत जोडलेले पुस्तक मागणी अर्ज प्रवेश अर्जासह कार्यालयात भरून द्यावे. ग्रंथालयासंबंधी सर्व नियम ग्रंथालय सूचना फलकावर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावलेले असतात. नियमासंबधीची सर्व माहिती ग्रंथपालाकडून मिळू शकेल. ठराविक मुदतीपेक्षा जास्त दिवस पुस्तके ठेवल्यास, पुस्तकांची पाने फाडल्यास तसेच पुस्तकात काही लिहिल्यास दंड आकारण्यात येईल. विद्यार्थ्यांनी सर्व पुस्तके वार्षिक परिक्षेचे प्रवेश पत्र घेण्यापूर्वी ग्रंथालयात परत करणे आवश्यक आहे. ग्रंथालयातच वाचन कक्षाची सोय असून नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, दैनिके व आवश्यक पाठ्यपुस्तके इत्यादींचा लाभ विद्यार्थ्यांना घेता येईल.

## क्रिडांगण

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये खेळ आणि स्पर्धेची गोडी निर्माण व्हावी शिवाय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थाकरिता महाविद्यालयात निरनिराळ्या खेळांची सोय करण्यात आलेली आहे. क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, फूटबॉल, हॉकी यासारख्या खेळांपासून ते खो - खो, कबड्डी, खेळापर्यंत आणि उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, रनिंग, भाला फेक इत्यादी खेळ व स्पर्धांकरीता महाविद्यालयात सोयी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त या खेळामध्ये भाग घ्यावा. विद्यापीठ आणि शिक्षण विभागाच्या वतिने आयोजित स्पर्धांमध्ये महाविद्यालयाची चमू नेहमी भाग घेत असते. उत्कृष्ठ खेळाडूंचा महाविद्यालय गौरव करते. आंतर महाविद्यालयीन खेळ व स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिक्षेत पुरक गुण प्रदान करण्यात येतात. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात हेल्थ सेंटरची सोय करण्यात आली.

## राष्टीय सेवा योजना

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने महाविद्यालयास राष्टीय सेवा योजनेचे २०० विद्यार्थ्यांचे पथक प्रदान केलेले असून या पथकाच्या माध्यमातून शिक्षणासोबतच समाज सेवेची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी असे प्रयत्न केले जातात. महाविद्यालयाच्या रासेयो पथकास राज्य शासनाने सर्वोत्तम

पथकाचे बक्षिस प्रदान केले आहे. शिवाय या पथकातील माजी विद्यार्थी प्रशांत ठाकरे यांची निवड दिल्ली येथील गणतंत्र दिवस परेडकरिता करण्यात आली होती. शिवाय याच पथकातील माजी विद्यार्थीनी कु. प्रिती गेडाम हिला राज्यस्तरीय सर्वोत्तम रासेयो स्वयंसेवक म्हणून सुध्दा राज्य शासनाने पुरस्कृत केले आहे. या रासेयो पथकामध्ये ऐच्छिकरित्या प्रवेश घेता येईल. पण प्रवेशित विद्यार्थ्यांची या पथकातील नियमित ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी विशेष शिबीर दत्तक गावामध्ये घेण्यात येतात. शिवाय निरनिराळ्या आंतर विद्यापीठ, आंतर महाविद्यालयीन शिबिरांमध्ये महाविद्यालयातील या पथकातील विद्यार्थ्यांना सहभागी होण्याच्या संधी प्रदान केल्या जातात. अमरावती विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे रासेयो मध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांस पूरक गुण विद्यापीठ परीक्षेमध्ये दिल्या जातात. साकेत चिंचमलातपुरे यांची आर.डी. परेड मुंबईसाठी निवड करण्यात आली होती.भुषण पावडे याची मुंबई येथे गणतंत्र पथसंचालनासाठी ,२६ जानेवारी २००६ ला निवड झाली होती. कु. शीतल कृ.डावके हीची नागपूर विद्यापीठा अंतर्गत आमगांव, दिल्ली येथे राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाली होती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने २००७-२००८ ला स्व. प्रा. कु. कुसूमताई नांदे प्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत या पथकातील विद्यार्थीनी कु. प्राची ठाकरे हिला मा. कुलगुरु कमलसिंह यांच्या हस्ते दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला.

राष्टीय सेवा योजना राज्यस्तरीय विशेष शिबीर २००७ - २००८ ला बीड जिल्ह्यातील श्रोंडराई येथे पथकातील विद्यार्थीनी कु. प्रविणा जाणे हिची निवड झाली होती.

सत्र २००८-२००९ मध्ये आयोजित राज्यस्तरीय राष्टीय सेवा योजना शिबीरात रोहित विजय नागले बी.ए. भाग - २ या विद्यार्थ्यांची निवड गोंदोडा (गुंफा), ता. चिमूर, जि. चंद्रपूर येथे झाली होती.

सन २००९-२०१० मध्ये राज्यस्तरीय राष्टीय सेवा योजना शिबीर आयोजित दि. १० ते १६ फेब्रुवारी २०१० या कालावधीत गुरुकुंज मोझरी येथे (१) विकास पांडुरंग जगाते (२) कु. शितल गावंडे (३) दिव्यसागर मेश्राम (४) कु. स्वाती टेकाडे (५) कु. नेत्रा गोहाड हे पाच विद्यार्थी सहभागी झाले होते.

## सामान्य विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग

अभ्यासात साधारणतः कच्चे असणाऱ्या विद्यार्थ्यांना खास वर्ग विशेषतः इंग्रजी आणि अकांऊटन्सी या विषयाचे आयोजित करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा ही अपेक्षा आहे. या संबंधीचा तपशील वेळीच सुचनाफलकावर लावण्यात येईल.

## छात्रसंघाचे गठण

महाराष्ट्र कायदा २०१६ व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचे निर्देशाप्रमाणे छात्रसंघाचे गठन केल्या जाईल.

## ओळखपत्र

विद्यार्थ्यांजवळ नेहमी ओळखपत्र असणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील कोणत्याही शिक्षकांनी किंवा अन्य कर्मचाऱ्यांने ओळखपत्राची मागणी केल्यास विद्यार्थ्यांनी ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना वर्गात बसता येणार नाही. ओळखपत्र हरविल्यावर त्याच्या दुय्यमप्रतीसाठी रु. ३० शुल्क भरावे लागेल.

## मुलींकरिता खास वस्तीगृहाची व्यवस्था

सत्र २०१५-१६ पासून महाविद्यालयात यु.जी.सी. अंतर्गत मुलींच्या वस्तीगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ताबडतोब प्रवेश निश्चित करावा.(फक्त ५० विद्यार्थीनीकरिता)

## डेस कोड

कनिष्ठ, एच.एस.सी. व्होकेशनल / व वरीष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी / विद्यार्थीनीकरिता सत्र २०१०-११ पासून गणवेष निर्धारीत करण्यात आले आहे. गणवेषा शिवाय विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्रांगणात / वर्गात प्रवेश मिळणार नाही. याची विद्यार्थ्यांनी/ पालकांनी नोंद घ्यावी.

## विद्यार्थ्यांसाठी एस. टी. बस भाडे सवलत योजना

महाविद्यालयात प्रवेशित शहराबाहेरील विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाच्यावतीने राज्य परिवहन महामंडळाच्या तर्फे बस भाडे सवलत प्रदान केल्या जाते. मुलांसाठी २५ वर्षे वयोमर्यादा असून मुलींसाठी वयाची अट नाही. बस भाडे सवलतीचा उपयोग विद्यार्थ्यांनी स्वत:साठी करावा. कोणत्याही अन्य अनधिकृत व्यक्तीस ''पास''हस्तांतरण करु नये तसेच पास वर अनधिकृतरित्या खाडाखोड करू नये. असे करणे गुन्हा ठरतो आणि राज्य परिवहन महामंडळ विद्यार्थ्यांवर फौजदारी प्रकरण दाखल करू शकते. बस वाहकाने किंवा कोणत्याही संबंधित अधिकाऱ्याने ''पास'' तपासणीसाठी मागीतल्यास ती सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

## विद्यार्थी सहकारी ग्राहक भंडार

विद्यार्थीपयोगी साहित्य वाजवी दरात विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे शिवाय सहकार क्षेत्रातील कामकाजाची ओळख व्हावी या दृष्टीने शासनाच्या सहकार विभागाकडून नोंदणी करुन महाविद्यालयाने विद्यार्थी सहकार ग्राहक भांडार सुरु केले असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे साहित्य या सहकारी ग्राहक भांडारातून ना नफा ना तोटा या तत्वावर विक्रीसाठी उपलब्ध असलेले साहित्य विकत घ्यावे, अशी अपेक्षा आहे.

## महाविद्यालयातील उपस्थिती

महाविद्यालयातील वेळापत्रकाप्रमाणे प्रत्येक तासिकांना उपस्थित राहणे विद्यार्थ्यांना बंधनकारक असून प्रत्येक महिन्यातील आणि एकूण सत्रातील उपस्थिती ७५ टक्क्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्यांना शुल्क सवलती/ शिष्यवृत्ती मिळणार नाही. शिवाय परिक्षेला सुध्दा बसता येणार नाही.

## महाविद्यालयीन परीक्षा

वर्ग ११ कला, वाणिज्य, विज्ञान आणि किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षेचे निकाल २ घटक चाचण्या स्वाध्याय व तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक आणि दोन सत्र परीक्षांच्या सरासरी गुणांवर अवलंबून असते. या परिक्षेमध्ये सरासरी ३५ टक्क्यापेक्षा कमी गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुत्तीर्ण म्हणून जाहीर करण्यात येईल. वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण प्रकल्प सादर केल्याशिवाय वार्षिक परिक्षेचा फॉर्म भरता येणार नाही. व वर्ग १२ च्या विद्यार्थ्यांना सुध्दा २ घटक चांचण्या स्वाध्याय व तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षां वार्षिक परिक्षेसाठी तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे. त्या शिवाय वार्षिक परिक्षा उत्तीर्ण होणार नाही आणि दोन सत्र परीक्षा देणे आवश्यक आहे.

विद्यापीठ वार्षिक परिक्षेशिवाय वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या चाचणी परीक्षा तसेच सराव परीक्षा घेण्यात येतात या सर्व परीक्षाना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन परिक्षेत प्रती विषयात २० टक्के पेक्षा कमी गुण मिळाले तर प्रत्येक विषयाला ५ रु. दंड आकारण्यात येईल. अनुपस्थित राहणाऱ्यांना प्रति विषयास २५ रु. दंड आकारण्यात येईल.

# विद्यापीठ पुरक गुण योजना

The Amravati University has passed an ordinance No.1/85 effective from summer 86 to award incentive marks to examinees, with the purpose of encouraging them to participate in the extra- curricular activitie listed below. The incentive marks will be awarded upto a maximum of 5% of the total marks of all papers taken together.

**Incentive Marks can be obtained on various heads :**

| | |
|---|---|
| 1. Blood Donation (each time) up to a a maximum of 5 | 2 Marks |
| 2. Games and Sports | |
| a) Participation in University recognized inter - Collegiate Contents | 3 Marks each |
| b) Participation in Inter University Contests | 5 Marks each |
| 3. NSS | |
| a) Participation for entire year (120 Hrs) | 5 Marks |
| b) Participation for entire year (Including one camp) | 6 Marks |
| c) Participation for entire year (including two camp) | 7 marks |
| 4. NCC | |
| a) Participation for entire year | 5 Marks |
| b) 'B' Certificate | 2 Marks |
| I 'C' Certificate | 2 Marks |
| d) Selection for Republic Day Parade | 3 Marks |
| 5. Cultural Activities | |
| a) Participation in University -recognised Inter - collegiate Debate / Elocution Drama / Song/ other contests | 3 Marks each |
| b) Participation in Inter University Contests | 4 Marks each |
| 6. Participation in Govt. sponssored Essential Statistics collection drive | 5 Marks |
| 7. Home Guards | 3 Marks |
| a) Participation for entire year | |
| 8. Participation for entire year (including one camp) | 5 Marks |

9. Besides he activities, incentive marks will also be awarded for other activities that may be announced by the University from time to time.

# शारीरिक शिक्षण वर्ग

दररोज सकाळी वेळापत्रकाप्रमाणे शारीरिक शिक्षणाचे वर्ग होतात. या सर्व वर्गांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांची या वर्गांना उपस्थिती ७५ टक्क्यापेक्षा कमी असेल त्यांना परिक्षेला बसता येणार नाही. शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने फेब्रुवारी मध्ये शारीरिक क्षमता परीक्षा घेतल्या जाईल या परीक्षेस सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अनुपस्थित विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेस बसा येणार नाही.

# वैद्यकीय परीक्षा

वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशीत सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचे वैद्यकीय परिक्षण विद्यापीठ मान्य वैद्यकांकडून महाविद्यालयात साधारणपणे सप्टेंबर मध्ये घेण्यात येते. वैद्यकीय परीक्षे संबंधी सूचना वेळीच विद्यार्थ्यांना दिल्या जाईल. वैद्यकांनी विद्यार्थ्यांचे परिक्षण केल्यावर आरोग्याच्या दृष्टीने त्यांनी सुचविलेल्या सूचना विद्यार्थ्यांनी पाळणे आवश्यक आहेत. या परिक्षेसाठी अनुपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांवर ५० रु. दंड आकारण्यात येईल शिवाय विद्यापीठ परीक्षेला त्यांना बसू दिल्या जाणार नाही.

# सायकल स्टॅन्ड

महाविद्यालयात सायकल स्टॅन्ड ची वार्षिक वर्गणी रु.५० वर्षाच्या सुरुवातीस प्रवेश घेतांना द्यावी लागेल. विहीत केलेल्या जागेवर स्वत:ची वाहणे विद्यार्थ्यांनी ठेवावीत व स्वत:च्या वाहनांना कुलूप लावून ठेवावे. इतरत्र वाहने ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंड आकारण्यात येईल.

# महाविद्यालयातील फर्नीचर

महाविद्यालयातील फर्नीचर हे विद्यार्थ्यांसाठीच असल्याने त्याची काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी फर्नीचरची नासधूस करतील त्यांना फर्नीचरच्या किंमती एवढा दंड आकारला जाईल किंवा ज्या वर्गातील फर्नीचरची नासधूस होईल त्या वर्गातील संपूर्ण विद्यार्थ्यांवर सामूहिक दंडात्मक कार्यवाही केल्या जाईल.

# Prohibition of Ragging

According to Maharashtra Prohibition of Ragging Act No. 33, 15th May 1999 'Ragging' in strictly prohibited. Ragging means display of disorderly conduct, doring of any act which cause or is; likely to cause physical or physiological

harm or raise apprehension or fear or shame or embarrassment to student in any educational institution and includes (1) Stesing, abusing, treating, or playing practicle jokes or causisng hurt, such student or (2) asking a student to do any act or perform something which such student will not, in the ordinary course willingly to do.

**Prohibition or ragging :-** Ragging within or outside of any educational institution is prohibited.

Penalty for ragging : Whoever directly or indirectly commits, participates in abets or propogates ragging within or outside any educational institution is prohibited.

Penalty for ragging : Whoever directly or indirectly commits, participates in abets or propogates ragging within or outside any educational institution shall on conviction be punished with an imprisonment fr a term which may xtent to two years and shall also be liable to a fine which may extent to ten thousand rupees.

Dismissal of students : Any student candidate of an offence under section 4 shall be dismissedfrom the educational institution for a period of five years from the date of order of such dismissal.

Suspension of Student : If the student is found guilty in such case he / she shall be terminated from the instution.

## महत्वाच्या सूचना

१. माहिती पत्रक काळजीपूर्वक वाचा आणि पुढील संदर्भासाठी त्याचा उपयोग करा.

२. प्रवेश अर्जावर, ग्रंथालय पुस्तक मागणी अर्जावर आवश्यक ती माहिती काळजीपूर्वक भरा. बी.ए. भाग १ व बी. कॉम भाग १ व बी.एस.सी. भाग १ या वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित होताच विद्यापीठाचा नामांकन अर्ज सुध्दा त्याचवेळी सादर करावा. नामांकन अर्ज सादर न केल्यास विद्यार्थ्यांचे नाव विद्यापीठात नोंदविल्या जात नाही. नामांकन अर्ज दाखल न केल्यास विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द होईल.

३. एटीकेटी सवलती ने प्रवेशित विद्यार्थ्यांनी हिवाळी/ उन्हाळी पुरवणी परिक्षेत परीक्षा उत्तीर्ण केल्याबरोबर गुणपत्रिकेची प्रमाणित सत्य प्रत कार्यालयात सादर करावी अन्यथा विद्यापीठाव्दारे त्यांनी घेतलेल्या वर्गाच्या परिक्षेचा निकाल रोखल्या जाईल याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील.

४. विद्यार्थ्याचा वा पालकाचा पत्ता बदलला तर त्याची नोंद ताबडतोब कार्यालयात करून द्यावी. प्रवेश अर्जावर मोहल्ल्यासह पूर्ण पत्ता, मोबाईल/ फोन क्रमांक लिहावा.

५. उगाच व्हरांड्यांत फिरू नका.तास नसेल तेव्हा ग्रंथालयात जाऊन नियतकालिके वाचा.

६. इतर वर्गाना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या.

७. वर्गात तासिकांना उपस्थित राहताना विषयाची पाठ्यपुस्तके व वह्या जवळ असणे आवश्यक आहे.

८. प्रत्येक तासाचे वेळी वर्गात शिक्षक / व्याख्याता येण्यापूर्वी जाऊन बसावे. उशिरा वर्गात प्रवेश केल्यास दंड आकारण्यात येईल.

९. महाविद्यालयाच्या सर्व कार्यक्रमांना आणि राष्टीय सेवा योजनेच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

१०. आवडेल त्या महाविद्यालयीन खेळ क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हा.

११. कार्यालयातून प्रस्तुत होणाऱ्या अधिसूचनांसाठी दररोज माहिती फलक पाहणे आवश्यक आहे.

१२. विद्यार्थ्यांची वागणूक प्राचार्यांना योग्य वाटत नसल्यात त्याला महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

१३. प्रवेशाच्या वेळेसच पूर्ण शुल्काचा भरणा करावा लागेल. इतर पूर्ण शिक्षण शुल्क भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी दरमहा शुल्क १० तारखेच्या आत भरणे अनिवार्य राहील. शिवाय परीक्षा आवेदनपत्र भरण्यापूर्वी राहीलेल्या संपूर्ण शुल्काची रक्कम भरावी लागेल.

१४. प्रगतीशील महाराष्ट राज्याच्या कायद्याप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी गुटखा, तंबाखु, पान खाणे किंवा धुम्रपान करणे तसेच मोबाईल यावर बदी घातली असून महाविद्यालयाच्या आवारात, वर्गात या कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर योग्य ती कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. विद्यार्थ्यांचे नांव सुध्दा कमी करण्यात येईल.

१५. महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांनी आपल्या सोबत इतर मित्रांना कोणतेही काम नसताना घेऊन येणे, वर्गात मित्रासह प्रवेश घेणे इत्यादी बाबी गैरप्रकार समजण्यांत येईल आणि उभयंतावर कारवाई करण्यात येईल.

१६. महाविद्यालयातील वर्ग खोल्या आणि इमारतीच्या भिंतीचा वापर घोषणा लिहिण्यांसाठी वा भित्तीपत्रक चिटकविण्यांसाठी व्यक्तिश: अथवा संघटनेस करता येणार नाही.

१७. महाविद्यालया संदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यांस कोणतेही वृत्त अनधिकृतपणे प्रसिध्दी करिता देता येणार नाही असे त्याने केल्यास आणि संबंधित विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

१८. प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्याने महाविद्यालय सोडल्यावर एका वर्षाच्या आत महाविद्यालय सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका आणि इतर कागदपत्र महाविद्यालयातून प्राप्त करुन घ्यावे असे न केल्यास २ ते ५ वर्ष कालावधीकरिता रु. २० आणि ५ वर्षानंतर च्या कालावधीकरिता रु. ५० विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१९. वेळोवेळी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, परिसंवाद, बचाव स्पर्धा व आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात येईल.